3. **सर्वसमावेशक अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम** :

राज्यातील गायी म्हशींची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी शासनाने सदर योजना राबविण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. योजनेमध्ये झालेल्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | वर्ष | नोंदणीकृत शेतक-यांची संख्या | नोंदणीकृत जनावरांची संख्या | झालेली कृत्रिम रेतने | जन्मलेली वासरे | | अनुदान वाटप केलेल्या वासरांची संख्या **(ऑगस्ट २०१८)** | प्राप्त निधी रु. लक्ष | झालेला खर्च रु. लक्ष **(ऑगस्ट २०१८)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मादी | नर | | | |
| १ | २०१३-१४ | ४४६८७ | ६३७९१ | ३५२२४ | ४४९२ | ३९८७ | ० | ६२०.०० | ४२.३७ |
| २ | २०१४-१५ | ११९३६ | १८१०८ | १६२९८ | १५७६ | १३१० | ० | ४२७.५० | ४२९.४९ |
| ३ | २०१५-१६ | १४१०५ | २३०४३ | १०९३४ | १०७९ | ८३४ | ७८२ | २१.०० | ३३६.६१ |
| ४ | २०१६-१७ | ११९४१ | २१२५३ | ४३७१ | ११३१ | ७६५ | ८४४ | ४०.०० | २१६.९४ |
| ५ | २०१७-१८ | १०१२२ | १७२५४ | ० | ० | ० | ६९२ | २१.०० | ६५.५१ |
| ६ | २०१८-१९ | ० | ० | ० | ० | ० | २७४ | ३.०० | २६.९३ |
| | **एकुण** | **९२७९१** | **१४३४४९** | **६६८२७** | **८२७८** | **६८९६** | **२५९२** | **११३२.५०** | **१११७.८५** |

योजनेअंतर्गत जन्मलेल्या वासरांच्या मानधनापोटी **रु**. 5000/- **प्रमाणे** 2592 **वासरांकरीता** पशुपालकांना प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्यात आले आहे. नोंदणीकृत गायी म्हशींना अतीउच्च वंशावळीच्या वळुंच्या गोठीत रेतमात्रांव्दारे कृत्रिम रेतन करण्यात येत आहे. त्याकरिता मंडळाने एचएफ जातीच्या 40000 व जर्सी जातीच्या 30000 गोठीत रेतमात्रा परदेशातून आयात केलेल्या आहे. अशाप्रकारे या उच्च दर्जाच्या गायी म्हशींपासून उच्च वंशावळीची संकरीत व देशी वासरे निर्माण करुन याव्दारे पीढी दरपीढी अनुवंशिक सुधारणा करण्याचे प्रयत्न चालु आहे.